

तीक्ष्ण नजर... अष्टौप्रहर
MAHARASHTRA EX-SERVICEMEN CORPORATION (MESCO)
PUNE
वीराय तस्मै नम:
महाराष्ट्र माजी सैनिक
महामंडळ मर्यादित
(मेस्को)
राज्य शासन अंगीकृत सेवा






# महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित

माजी सैनिकांच्या कल्याणार्थ व पुनर्वसनासाठी महाराष्ट्र शासन अंगीकृत या महामंडळाची स्थापना दि. १८ जानेवारी २००२ रोजी करण्यात आली आहे.

## महामंडळाचे ब्रीद-शिस्तबद्ध सेवा

शिस्त जेथे, प्रगती तेथे...!

याची जाणीव ठेवूनच आमच्या महामंडळाचा प्रत्येक सदस्य त्यादृष्टीने कार्य करीत असतो. नेमून दिलेले प्रत्येक काम शिस्तीत आणि वेळेत करण्यात म्हणूनच ही मंडळी नेहमीच यशस्वी होतात. याचा फायदा त्यांच्याशी संबंधित सर्व संस्था, कंपन्यांना होतो. शिस्तबद्ध कार्याची परंपरा, जबाबदारी आणि त्यागाच्या भावनेतून आयुष्यभर भारतीय सैन्यदलात काम केलेले तडफदार सैनिक 'मेस्को'च्या माध्यमातून पुन्हा एकदा समाजसेवेसाठी सज्ज झाले आहेत.

## महामंडळाची उद्दिष्ट्ये व ध्येयधोरणे

* शारिरीकदृष्ट्या कणखर, मानसिकदृष्ट्या खंबीर, शिस्तबद्ध व पूर्णतः व्यावसायिक रित्या कार्यक्षम माजी सैनिकांचे पुनर्वसन करतानाच त्यातून सार्वजनिक, खासगी आणि शासकीय संस्थांना सर्वोत्कृष्ट दर्जाची सुरक्षासेवा पुरविणे
* या माजी सैनिकांना त्यांच्या निवासस्थानाजवळ अथवा त्यांच्याच जिल्ह्यामध्ये जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध करून देणे, हे महामंडळाचे प्रमुख उद्दीष्ट आहे.
* 'मेस्को'च्या नफ्याची रक्कम ध्वजदिन निधीमध्ये जमा करणे. हा निधी युद्ध विधवा, युद्धात अपंग झालेले सैनिक, माजी सैनिक व त्यांच्या पाल्यांकरिता कल्याणकारी योजनांसाठी

## महामंडळाची सेवा व कार्यक्षेत्रे


* **संपूर्ण सुरक्षा व्यवस्था यंत्रणा**
  - ☑ वर्तमानकाळ तसेच भविष्यकाळातील सर्व प्रकारच्या धोक्याची पूर्वकल्पना आस्थापनांना देणे, त्यासाठी आवश्यक ती सर्वोच्च सुरक्षा प्रदान करणे
  - ☑ सुरक्षा व्यवस्थेच्या नियोजन व अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन करणे
  - ☑ उच्च प्रशिक्षकांकडून सुरक्षा सैनिकांना उत्कृष्ट दर्जाचे सुरक्षा प्रशिक्षण देणे
  - ☑ पेट्रोलपंप चालविणे ☑ टोलनाक्यावर पथकर वसुलीची कामे करणे
  - ☑ सातारा येथे अद्यावत व संगणकीकृत ऑफसेट प्रिंटिंग प्रेस चालविणे

**'मेस्को एंटरप्रायजेस' सातारा द्वारे पुढील कामकाज केले जाते.**

- ☑ संगणक प्रशिक्षण केंद्र चालविणे यामध्ये एमएससीआयटी, टॅली, सीसीसीको विथ एमएस ऑफिस, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट प्रोग्राम (मायक्रोसॉफ्ट कोर्स), पीजीडीसीए (मॉरफस ग्लोबल युनिव्हर्सिटी, लंडन), फायनान्शिअल अकौंटिंग (इटीएच, पुणे युनिव्हर्सिटी), व्ही.बी.६.० (SiiT Edn) अशासारखे अभ्यासक्रम शिकविले जातात.
- ☑ ३० दिवसांचे भारतीय सैन्यदल व पोलीस भरतीपूर्व लेखी व शारिरीक परिक्षेसह प्रशिक्षण शिबीराचे आयोजन. यासाठी निवास, भोजन व प्रशिक्षणासाठी किफायती शुल्क आकारले जाते. त्यातून ५०० रु. भरती झाल्याचा पुरावा सादर केल्यानंतर परत केले जातात.
- ☑ झेरॉक्स व लॅमिनेशन सेंटर चालविणे.

* वाहनचालक, लेखनिक व तंत्र कौशल्यामध्ये अनुभव प्राप्त माजी सैनिक पुरविणे
* स्थापत्य (बांधकाम) प्रकल्प उभारणीचे काम स्वीकारुन ते वेळेत पूर्ण करणे
* पावसाच्या पाण्याचे जमिनीमध्ये पुर्नभरण करणे (रेन वॉटर हार्वेस्टिंग)

**पारदर्शी व्यवहारातून सचोटीची सेवा आहे म्हणूनच आमचा सदस्य, प्रत्येकाला हवा आहे !**




## महामंडळाची बलस्थाने

* माजी सैनिकांच्या कल्याणासाठी आणि पुनर्वसनासाठी कार्यरत राज्य शासनाचा अंगीकृत उपक्रम
* शासकीय कंपनी म्हणून अधिकृत नोंदणी
* खासगी सुरक्षायंत्रणा अधिनियम २००५च्या अनुसार परवाना प्राप्त संस्था
* डायरेक्टर जनरल (पुनर्वसन- डी.जी.आर.), रक्षा मंत्रालय (केंद्र सरकार) यांच्याशी अधिकृतरित्या निगडीत
* महाराष्ट्र राज्य शासन निर्णय, दि. १४ नोव्हेंबर २००२ अन्वये सर्व सरकारी, निमसरकारी, सहकारी संस्था, नगरपालिका, स्वायत्त संस्था यांनी महामंडळा-कडून विनानिविदा सुरक्षा सेवा घेण्यास शासनाची अधिकृत अनुमती
* केंद्रशासीत सार्वजनिक विभाग तसेच त्यांच्या राज्यस्तरीय विभागांना 'डीजीआर'- केंद्रीय खात्याच्या प्रायोजकत्वाशिवायही 'मेस्को'ची सुरक्षा यंत्रणा घेण्यास अनुमती
* कामगार विषयक सर्व कायद्यांचे अत्यंत काटेकोर पालन करणारे महामंडळ (उदा. किमान वेतन कायदा, ई.एस.आय., ई.पी.एफ., एच.आर.ए., डब्ल्यू.सी.ए., ग्रॅज्युईटी, बोनस इ.) आणि या योजनांचा माजी सैनिकांना फायदा तसेच आमच्या ग्राहकांना कायदेशीररित्या सुरक्षा देणे
* शिस्त, प्रामाणिकपणा, गुणवत्तापूर्ण सेवा, त्याग आणि संपूर्ण पारदर्शक व्यवहार या बाण्यानुसार महामंडळाचे कार्य अखंडपणे सुरु आहे.

## सुरक्षेसह संगणक साक्षरताही...!



आमचे महामंडळ केवळ सुरक्षा रक्षक पुरविण्याचे काम करते, असे नाही. तर आगामी काळाची गरज ओळखून त्यादृष्टीने विविध उपक्रमही राबवित आहे.

आजची आपली युवा पिढी ही संगणक साक्षर होण्यासाठी धडपडत असते. पूर्वी जसे शालेय साक्षरतेचे महत्व होते तसेच आज संगणक साक्षरतेला महत्व आलेले आहे. 'जो संगणक शिकला, तोच इथे टिकला' असे आजच्या काळाबाबत म्हणता येईल. हे ओळखून आमच्या महामंडळाने युवा पिढीसाठी तसेच माजी सैनिक, त्यांचे पाल्य, युद्धविधवा पत्नी अशांकरिता विशेष असा 'संगणक प्रशिक्षण' वर्ग सातारा, नागपूर व अहमदनगर येथे सुरू केला आहे. विविध संगणक कोर्सेस तेथे शिकविले जातात. त्याचबरोबर आमच्या सुरक्षा सैनिकांनाही हे प्रशिक्षण मागणीनुसार दिले जाते. अशा संगणक प्रशिक्षित सुरक्षा सैनिकाची आजघडीला समाजाला मोठ्या प्रमाणावर गरज आहे. आमच्याकडे विविध संस्थांतर्फे अशा सैनिकांची मागणी दिवसेंदिवस वाढते आहे. यावरूनच आमच्या या आधुनिक प्रशिक्षणाचे महत्व लक्षात येते.

## या महामंडळाचे वेगळेपण नेमके कशात?



भारतीय सैन्यदलाची अत्यंत महत्वाची अशी जी कार्यमूल्ये आहेत ती म्हणजेच शिस्त, प्रामाणिकपणा, इमानदारी, शारिरीक कणखरपणा, मानसिक सावधानता, कार्यक्षमता, व्यावसायिकता आणि कार्यात झोकून देण्याची त्यागवृत्ती हे सारे 'मेस्कोच्या' सुरक्षा सैनिकांमध्ये असते. सुरक्षा यंत्रणेमध्ये सर्वात महत्वाचे ठरणारे हे घटक 'मेस्को'मध्ये आहेत याचा आम्हाला अभिमान आहे. सुरक्षेसंबंधी सर्व भारतीय कायदे-कानून तसेच कामगारविषयक कायदे पूर्णपणे पाळण्याचे धोरण 'मेस्को'मध्ये असल्याने येथे सर्वांना समान न्याय मिळतो. आमच्या सुरक्षा रक्षकांशी तसेच सन्मानीय ग्राहकांशी अत्यंत पारदर्शीपणाने व्यवहार करण्यास 'मेस्को' वचनबद्ध आहे. आमचे सुरक्षा रक्षक पूर्वी सैन्यदलाच्या माध्यमातून देशसेवा करीत होते आणि आता 'मेस्को'च्या माध्यमातून ते पुन्हा एकदा देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी म्हणजेच आपल्यासाठी ते सज्ज झाले आहेत.

**एकच लक्षात घ्या.... आपल्या सुरक्षित भविष्यकाळासाठी माजी सैनिक स्वत:चा वर्तमानकाळ प्रदान करीत आहेत.**

## ✲ आमचे सन्माननीय ग्राहक ✲

✲ **भारत संचार निगम (बी.एस.एन.एल.)** : नागपूर व सातारा
✲ **एमएसपीजीसीएल** : परळी वैजनाथ, एकलहरे (नाशिक), पारस (अकोला), दीपनगर (भुसावळ), पोफळी, उरण, कोराडी (नागपूर) आणि इतर १६ एचपीएस केंद्रे
✲ **एमएसइडीसीएल व एमएसइटीसीएल** : पुणे, लोणीकंद, सांगली, सातारा, कोल्हापूर, बीड, नांदेड, अहमदनगर, जळगाव, नाशिक, धुळे, परभणी, नागपूर, औरंगाबाद, वर्धा, अमरावती
✲ **महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ** : पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, भंडारा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर, जळगाव, वर्धा, नाशिक, अहमदनगर, परभणी, सोलापूर, लातूर, जालना, अमरावती, नांदेड, बीड, धुळे, बुलढाणा, उस्मानाबाद येथील विभागीय/केंद्रीय वर्कशॉप्स
✲ **औद्योगिक प्रशिक्षण संस्था** : पुणे, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, मुंबई व ठाणे विभाग
✲ **राष्ट्रीयकृत व सहकारी बँका** : पुणे, कोल्हापूर, नाशिक, सोलापूर, भिगवण, मालेगाव, बीड, नागपूर
✲ **एम.आय.डी.सी.** : पुणे, अहमदनगर, नाशिक, कोल्हापूर, सातारा, कराड
✲ **आकाशवाणी** : पुणे, औरंगाबाद, नागपूर, सातारा, सांगली, धुळे, उस्मानाबाद, नाशिक, नांदेड, परभणी, अहमदनगर, बोरिवली, पन्हाळा (कोल्हापूर), सोलापूर व तळेगाव
✲ **दूरदर्शन** : पुणे, नागपूर, औरंगाबाद, अंबाजोगाई, नांदेड, भुसावळ, जळगाव, सातारा
✲ **शासकीय तंत्रनिकेतन** : जळगाव, अहमदनगर, अमरावती, नाशिक, वर्धा, धुळे, खामगाव, सोलापूर, यवतमाळ, जालना, वाशिम
✲ **अभियांत्रिकी महाविद्यालये** : जळगाव, औरंगाबाद, अमरावती
✲ **बालभारती** : पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, नागपूर, कोल्हापूर
✲ **महानगरपालिका** : नागपूर, नांदेड
✲ **जिल्हा परिषद** : कोल्हापूर, उस्मानाबाद, जालना
✲ **सरकारी रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालये** : औरंगाबाद, नागपूर, उस्मानाबाद, बीड, अंबाजोगाई, नांदेड, लातूर, अकोला, सांगली, मिरज, सोलापूर, यवतमाळ, अमरावती तसेच टाटा मेमोरिअल हॉस्पिटल, मुंबई
✲ **विद्यापीठे** : शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), मराठवाडा कृषी विद्यापीठ (परभणी)
✲ **सीडब्ल्यूपीआरएस** : खडकवासला व **एनडब्ल्यूए** (खडकवासला)
✲ यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे
✲ एस.एस.सी./एच.एस.सी. मंडळ, महाराष्ट्र
✲ परांजपे ऑटोकास्ट : सातारा व शिरवळ ✲ आयबीएम, नागपूर
✲ अणुविकास कॉलनी, तारापूर ✲ फॉर्च्युना इंजिनिअरिंग प्रा. लि., नाशिक
✲ पी.ए.ओ., लेखानगर, नाशिक ✲ ज्युबिलीयंट ऑरगेनोसिस लि. निरा











आपल्या संपूर्ण सुरक्षेसाठी अष्टौप्रहर कार्यरत

## महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित

स्पर्धेच्या युगात आजच्या
प्रत्येकाला आघाडीवर राहायचे आहे
कष्टपूर्वक वाढवलेले सारे
प्राणपणाने राखायचे आहे..!
कमावलेल्या प्रत्येक रुपयाचे
जतन, संवर्धन करायचे आहे
म्हणूनच सुरक्षा यंत्रणेसाठी
जागृत प्रत्येकाला व्हायचे आहे
त्यासाठी आमच्या माजी सैनिकांचे
समर्पण लक्षात घ्यायचे आहे...!

### आजवरची वाटचाल



**वाटचाल आजवरची यशस्वी झाली, कल्याणार्थ सर्वांच्या, सेवा घडली!**

* आजवर महाराष्ट्राच्या ३३ जिल्ह्यातील २५३ प्रतिष्ठित कंपन्या/ग्राहकांना 'मेस्को' तर्फे ४७०० माजी सैनिकांना नोकऱ्या देण्यात आलेल्या आहेत.
* मुंबईत एक पेट्रोलपंप चालविण्यात येतो.
* दोन टोलनाक्यावरील पथकर वसुली केंद्राचे संचालन
* सातारा येथे स्वत:ची संपूर्ण संगणकीकृत 'कारगिल ऑफसेट प्रिंटिंग प्रेस' कार्यरत आहे, जेथे सर्व प्रकारच्या दर्जेदार छपाईची कामे होतात.
* महाराष्ट्र राज्यातील युवकांना सैनिक तथा पोलीस भरतीसाठी उपयुक्त ठरणारे प्रशिक्षण शिबीर केंद्र सातारा येथे यशस्वीपणे चालविण्यात येत असून सदर केंद्रातून आजवर ३८०० युवकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.
* १५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सातारा, अहमदनगर आणि नागपूर येथील संगणक प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. अशाच प्रकारची प्रशिक्षण केंद्रे औरंगाबाद आणि कराड येथेही सुरु करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
* पर्ज्यनवृष्टीतील पाण्याचे पुनर्भरण (रेन हार्वेस्टिंग) चे एकूण ४ प्रकल्प कार्यान्वित आहेत.
* मुला-मुलींची वसतीगृहे, बहुद्देशीय हॉलचे बांधकाम तसेच शासनाच्या इमारतींची देखभाल/दुरुस्तीची कामे 'मेस्को'च्या स्थापत्य बांधकाम विभाग (सिव्हिल कन्स्ट्रक्शन विंग) तर्फे यशस्वीपणे करण्यात येतात.

**जेंव्हाही आपणांस कधी सुरक्षेची गरज भासेल**
**पूर्ण तयारीनिशी 'मेस्को' सज्ज असेल..!**

वीराय तस्मै नमः

# Maharashtra Ex-Servicemen Corporation Ltd.

## (MESCO)

**State Government Undertaking**

'Raigad', 2nd Floor, Opp. National War Memorial, Ghorpadi, Pune 411 001

Tel.: 020-26302659

Email.: contact@mescoltd.co.in

- Kargil Offset Printing Press (Satara) : ☎ 02162- 227779
- Computer Training Centre (Satara) : ☎ 02162-229658